शासकीय / निमशासकीय / स्थानिक स्वराज्य संस्थांच्या इमारतींमध्ये ऊर्जा संवर्धनास चालना देण्यासाठी ऊर्जा संवर्धन तंत्रज्ञान पथदर्शी प्रकल्प राबविण्यासाठी अर्थसहाय्याची योजना.

महाराष्ट्र शासन
शासन निर्णय क्र.अपाऊ २०१०/प्र.क्र.४७०/ऊर्जा-७
उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग,
मंत्रालय, मुंबई-३२
दिनांक : १३ जानेवारी, २०११

प्रस्तावना-

शासकीय/निमशासकीय/ स्थानिक स्वराज्य संस्थांच्या इमारतींमध्ये ऊर्जा संवर्धनासाठी / ऊर्जा बचतीसाठी प्रत्येक क्षेत्रात सुमारे २५ ते ५० टक्के वाव आहे. ऊर्जा बचतीसाठीचे तंत्रज्ञान विकसित होण्याची प्रक्रिया निरंतर स्वरुपाची आहे. सदर तंत्रज्ञान वापरास पाहिजे तेवढया गतीने चालना मिळत नसल्याने आणि नवीन तंत्रज्ञान हे सुरुवातीस तुलनेने महाग असल्याने त्याच्या वापरासाठी प्रोत्साहन देणे आवश्यक आहे.

ऊर्जा कार्यक्षमता वाढविण्याच्या दृष्टीने नव्याने उपलब्ध होत असलेल्या तंत्रज्ञानाचा वापर करुन त्यासाठी पथदर्शी प्रकल्प राबवून जनतेस उदाहरण म्हणून दिल्यास अशा तंत्रज्ञानाचा प्रचार व प्रसार होण्यास चालना मिळेल. शासकीय / निमशासकीय / स्थानिक स्वराज्य संस्था यांच्याकडील एखाद्या इमारतीमध्ये ऊर्जा संवर्धन प्रकल्प पथदर्शी पध्दतीने राबविल्यास त्या संबंधित विभागामध्ये ऊर्जा संवर्धनाची संकल्पना रुजविण्यास मदत होईल. त्यासाठी शासकीय / निमशासकीय / स्थानिक स्वराज्य संस्थांना प्रकल्प राबविण्यासाठी अर्थ सहाय्य उपलब्ध करण्याचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन होता.

शासन निर्णय

राज्यातील शासकीय/ निमशासकीय /स्थानिक स्वराज्य संस्थांच्या अखत्यारितील इमारतींमध्ये खालीलप्रमाणे ऊर्जा संवर्धन पथदर्शी प्रकल्प राबविण्यासाठी शासनाची मान्यता देण्यात येत आहे.

अ. योजनेची तांत्रिक माहिती व परिमाण -

शासकीय/ निमशासकीय संस्था / स्थानिक स्वराज्य संस्था यांच्या अखत्यारितील एका इमारतीत ऊर्जा संवर्धनाचा पथदर्शी प्रकल्प राबविण्यासाठी एका वित्तीय वर्षात एकूण रु. २५ लाखापर्यंत अर्थसहाय्य महाऊर्जामार्फत उपलब्ध करता येईल व त्यासाठी लागणारे तांत्रिक सहाय्यही महाऊर्जाकडून उपलब्ध करण्यात येईल.सदर पथदर्शी प्रकल्पांतर्गत इमारतींमध्ये वापरात असलेली जुन्या तंत्रज्ञानाची उपकरणे / यंत्रणा काढून नवीन तंत्रज्ञानावर आधारित उपकरणे बसविणे, उपकरणे/ यंत्रणा यांमध्ये

आवश्यकतेनुसार बदल करणे, ऊर्जा बचतीसाठी अपारंपरिक ऊर्जास्त्रोतांचा किफायतशीर वापर करणे, इमारतींमध्ये ऊर्जा वापर मोजमाप व मॉनिटरींग करणारी यंत्रणा बसविणे इत्यादिचा समावेश असेल.

**ब. योजनेची अंमलबजावणी**

सदर पथदर्शी प्रकल्पांतर्गत योजनेची माहिती सर्व शासकीय विभागांना तसेच त्यांचे अखत्यारितील निमशासकीय / स्थानिक स्वराज्य संस्था यांना महाऊर्जामार्फत कळविण्यात येऊन ज्या शासकीय विभाग/ निमशासकीय / स्थानिक स्वराज्य संस्थांची सहभागी होण्याची इच्छा असेल, त्यांनी ऊर्जा संवर्धन पथदर्शी प्रकल्पासाठी इमारतीची निवड करावी. त्यासाठी सदर इमारतीचे ऊर्जा परीक्षण महाऊर्जाकडील नोंदणीकृत ऊर्जा परीक्षण संस्थेकडून करण्यात यावे. ऊर्जा परीक्षण अहवालातील सुचविलेल्या ऊर्जा बचतीच्या उपाययोजनांच्या अनुषंगाने प्रस्ताव योजनेत सहभागी होणाऱ्या संबंधित संस्थाकडून महाऊर्जाकडे सादर करण्यात आल्यानंतर महाऊर्जाकडून आवश्यक ती तांत्रिक छाननी करण्यात येईल. सदर योजनेत सहभागी होणाऱ्या संबंधित संस्थांना अर्थसहाय्य उपलब्ध करुन दिले जाईल. याकरिता प्रकल्पाची निविदा प्रक्रिया करणे, प्रकल्प राबविणे व हमी कालावधीनंतर देखभाल दुरुस्ती करणे तसेच योजनेच्या अनुषंगाने उदभवणा-या इतर बाबींची पूर्तता संबंधित संस्थांकडून करण्यात येईल. प्रकल्प राबविण्यासाठी महाऊर्जाकडून तांत्रिक सहाय्य उपलब्ध करुन देण्यात येईल. सदर योजनेच्या सविस्तर मार्गदर्शक सूचना महाऊर्जाकडून निर्गमित करण्यात येतील व त्या संबंधित संस्थांना बंधनकारक असतील. तसेच योजनेच्या अंमलबजावणीचा प्रगती अहवाल महाऊर्जा शासनास सादर करील.

सदर योजनेसाठी आर्थिक तरतूद करण्याची, अनुदानाचे निकष ठरविण्याची, योजनेबाबत सविस्तर मार्गदर्शक सूचना निर्गमित करण्याची तसेच तांत्रिक बाबी निश्चित करण्याची जबाबदारी महाऊर्जाची राहील.

**क. आर्थिक तरतूद**

सदर योजना सन २०१०-११ पासून राबविण्यासाठी मान्यता देण्यात येत असून, यासाठी होणारा खर्च "२८१०-वीज- अपारंपारिक ऊर्जा साधने "या मुख्य लेखाशिर्षा खाली मंजूर अनुदानातून भागविण्यात यावा.

( सु. दि. पारधी )
प्रभारी अवर सचिव, महाराष्ट्र शासन.

प्रति,
अध्यक्ष,महाराष्ट्र राज्य विद्युत नियामक आयोग, मुंबई.( पत्राने )

C:\Documents and Settings\admin\Desktop\c.r.४७०.doc-१-१-११-४.doc

महासंचालक, महाराष्ट्र ऊर्जा विकास अभिकरण (महाऊर्जा), म्हाडा कमर्शियल कॉम्प्लेक्स, त्रिदलनगरसमोर, येरवडा, पुणे-४११ ००६
प्रधान सचिव, मुख्यमंत्र्याचे सचिवालय, मंत्रालय, मुंबई.
सचिव, उपमुख्यमंत्र्यांचे सचिवालय, मंत्रालय,मुंबई.
मा. मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन, मंत्रालय,मुंबई.
अप्पर मुख्य सचिव,( सामान्य प्रशासन विभाग), मंत्रालय,मुंबई.
अप्पर मुख्य सचिव ( नियोजन ), मंत्रालय,मुंबई.
अप्पर मुख्य सचिव ( महसूल ),मंत्रालय,मुंबई.
अप्पर मुख्य सचिव( वने),मंत्रालय,मुंबई.
प्रधान सचिव( वित्त), मंत्रालय,मुंबई.
प्रधान सचिव( उद्योग ), मंत्रालय, मुंबई.
प्रधान सचिव ( आदिवासी ) मंत्रालय,मुंबई.
प्रधान सचिव ( नगरविकास-२ ), मंत्रालय,मुंबई.
सचिव( ग्राम विकास ) मंत्रालय, मुंबई.
सचिव ( सार्वजनिक बांधकाम विभाग),मंत्रालय,मुंबई.
प्रधान सचिव (सहकार)मंत्रालय, मुंबई.
खाजगी सचिव ,मा. मंत्री( अपाऊ), मंत्रालय,मुंबई.
खाजगी सचिव सर्व मा. मंत्री/ मा.राज्यमंत्री, मंत्रालय,मुंबई.
सर्व परवानाधारक कंपन्या.
विकास आयुक्त,( उद्योग ) उद्योग संचालनालय, नवीन प्रशासन भवन, मुंबई.
मुख्य अभियंता ( विद्युत ) महाराष्ट्र शासन, सार्वजनिक बांधकाम विभाग, प्रशासकीय इमारत ३ रा मजला, रामकृष्ण चेंबूरकर मार्ग, चेंबूर ( पूर्व), मुंबई-७१.
व्यवस्थापकीय संचालक महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळ सूत्रधार कंपनी मर्यादित, मुंबई-४०० ०५१
व्यवस्थापकीय संचालक महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित,मुंबई-४०० ०५१
व्यवस्थापकीय संचालक महाराष्ट्र राज्य विद्युत निर्मिती कंपनी मर्यादित, मुंबई-४०० ०५१
व्यवस्थापकीय संचालक महाराष्ट्र राज्य विद्युत पारेषण कंपनी मर्यादित,मुंबई-४०० ०५१
सर्व मंत्रालयीन विभाग.
सर्व सन्माननीय विधानसभा सदस्य /विधान परिषद सदस्य.
सर्व महानगरपालिका/ नगरपालिका / जिल्हा परिषदा.
ऊर्जा विभागातील सर्व कार्यासने.
निवड नस्ती ( ऊर्जा-७ ) उद्योग ऊर्जा व कामगार विभाग, मंत्रालय, मुंबई-३२.